**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांकः 23.06.2024** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

1. **पोलाद, लोह आणि ॲल्युमिनियमपासून निर्मित दुधाच्या कॅनवर 12 टक्के एकसमान जीएसटी दराची शिफारस.**
2. **18 व्या लोकसभेचे पहिले अधिवेशन उद्यापासून सुरू होणार.**
3. **राष्ट्रीय चाचणी संस्थेचे महासंचालक सुबोध कुमार सिंग निलंबित, बिहार मधून 6 जणांना तर महाराष्ट्रातील लातूर मधून 2 जणांना अटक.**
4. **वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी आज होणारी नीट-PG प्रवेश परीक्षा लांबणीवर, नवीन तारीख लवकरच जाहीर होणार.**

**आणि**

5. **20 षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत बांग्लादेशवर मात.**

**जीएसटी-बायोमेट्रीक**

वस्तु आणि सेवा कर परिषदेनं पोलाद, लोह आणि ॲल्युमिनियमपासून निर्मित दुधाच्या कॅनवर **12** टक्के वस्तु आणि सेवा कर म्हणजे जीएसटीच्या एकसमान दराची शिफारस केली आहे. नवी दिल्ली इथं काल झालेल्या ५३व्या वस्तु आणि सेवा कर परिषदेच्या बैठकीनंतर अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी माध्यमांशी बोलताना, रेल्वे फलाट तिकिटं, विश्राम कक्ष आणि प्रतीक्षा कक्षाच्या सुविधांसाह भारतीय रेल्वेकडून सर्वसामान्य नागरिकांना पुरवल्या जाणाऱ्या सेवा तसच बॅटरीवर चालणाऱ्या कार सेवांवर कोणताही जीएसटी लागणार नाही अशी घोषणा केली. विविध प्रकारच्या पुठ्ठ्यांच्या खोक्यावर **12** टक्के एकसमान जीएसटी दराची शिफारस परिषदेनं केली आहे हिमाचल प्रदेश आणि जम्मू आणि काश्मीरच्या सफरचंद उत्पादकांना याचा फायदा होईल असं सीतारामन यांनी सांगितलं. बायोमेट्रिक-आधारित आधार प्रमाणीकरण अखिल भारतीय आधारावर लागू केलं जाणार असून खोट्या इनव्हॉइसद्वारे केलेल्या इनपुट टॅक्स क्रेडिटच्या दाव्यांना आळा घालण्यात याची मदत होईल अशी अपेक्षा असल्याचं त्या म्हणाल्या. लहान करदात्यांच्या सुविधेसाठी GSTR-4 फॉर्ममध्ये तपशील आणि रिटर्न सादर करण्यासाठीची मुदत **30** एप्रिल वरुन **30** जून पर्यंत वाढवण्याची शिफारसही परिषदेनं केली आहे.

**संसद**

**18** व्या लोकसभेचे पहिले अधिवेशन उद्यापासून सुरू होणार आहे. अधिवेशनादरम्यान नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी होणार आहे. लोकसभेचे प्रभारी अध्यक्ष म्हणून नियुक्त

केलेले ज्येष्ठ भाजप खासदार भर्तृहरी महताब हे नवनिर्वाचित खासदारांना शपथ देतील. नवीन लोकसभा अध्यक्षांची निवड या महिन्याच्या २६ तारखेला होणार आहे, तर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू २७ जून रोजी लोकसभा आणि राज्यसभेच्या संयुक्त बैठकीला संबोधित करतील. राज्यसभेचे अधिवेशन या महिन्याच्या २७ तारखेला सुरू होणार आहे. संसदेचे अधिवेशन ३ जुलैला संपणार आहे.

**एनटीए-समिती**

राष्ट्रीय चाचणी संस्था म्हणजे एनटीएद्वारे घेतल्या जाणाऱ्या परीक्षा पारदर्शक, सुरळीत आणि निष्पक्ष पद्धतीने पार पडाव्यात यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण विभागाने तज्ञांचा सहभाग असलेली एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. इस्रोचे माजी अध्यक्ष डॉक्टर के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालील ही सात सदस्यीय समितीकडे एनटीएच्या परीक्षा प्रक्रियेत कार्यक्षमता वाढवणे, नियमांच्या उल्लंघनास रोखणे, आकडेवारी सुरक्षा यंत्रणेचा दर्जा वाढवणे आणि समितीची रचना तसच कार्यपद्धतीचा आढावा घेण्यासाठी शिफारस करणे, विद्यमान प्रक्रियांचं मूल्यांकन आणि सध्याच्या तक्रार निवारण यंत्रणेचं मूल्यांकन करून त्यात आवश्यक सुधारणा सुचवणं अश्या जबाबदऱ्या असणार आहेत. मंत्रालयाला अहवाल सादर करण्यासाठी या समितीला दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचं हित आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्याला सरकार सर्वोच्च प्राधान्य देत असल्याचं, या समितीच्या स्थापनेनंतर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितलं.

**युजीसी-समिती**

राष्ट्रीय चाचणी संस्था म्हणजे एनटीएद्वारे परीक्षा पारदर्शक, सुरळीत आणि निष्पक्षपणे पार पाडण्यासाठी तज्ज्ञांची उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याच्या शिक्षण मंत्रालयाच्या निर्णयाचं विद्यापीठ अनुदान आयोग म्हणजे यूजीसीनं स्वागत केलं आहे. प्रवेश परीक्षा पारदर्शक, सुरळीत आणि निष्पक्षपणे पार पाडण्यासाठी तज्ञांची उच्च-स्तरीय समिती स्थापन करणे हे एक स्वागतार्ह पाऊल आहे असं समाज माध्यमा वरील संदेशात यूजीसीचे अध्यक्ष ममिदला जगदेश कुमार यांनी म्हटलं आहे.

**एनटीए-महासंचालक**

नीट परीक्षेच्या वादात राष्ट्रीय चाचणी संस्थेचे महासंचालक सुबोध कुमार सिंग यांना त्यांच्या पदावरून हटवण्यात आलं आहे. भारतीय व्यापार प्रोत्साहन मंडळाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक प्रदीप सिंग खरोला यांच्याकडे एनटीएच्या महासंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

**नीट-अटक**

दरम्यान नीट परीक्षा **2024** मधील कथित गैरव्यवहार प्रकरणी बिहार पोलिसांनी झारखंडच्या देवघर जिल्ह्यातून सहा जणांना अटक केली आहे. संशयितांना देवीपूर पोलीस स्टेशन

परिसरात एम्स-देवघर परिसरात पकडण्यात आलं. बिहार पोलिसांची आर्थिक गुन्हे शाखा या प्रकरणाचा तपास करत आहे. या संदर्भात महाराष्ट्रातील लातूर इथही दोन जणांना ताब्यात घेण्यात आलं असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. हे दोघेही जिल्हा परिषद शाळेत शिक्षक असून ते लातूरमधून खाजगी शिकवणी वर्ग चालवतात.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.**

**नीट**-PG

वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय परीक्षा मंडळाद्वारे आयोजित, आज होणारी नीट-**PG** प्रवेश परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. परीक्षेची नवीन तारीख लवकरात लवकर जाहीर केली जाईल. काही स्पर्धा परीक्षांच्या विश्वासार्हतेबाबत झालेल्या आरोपांच्या अलीकडच्या घटना लक्षात घेऊन विद्यार्थ्यांच्या हितासाठी  हा निर्णय घेण्यात आला आहे असं आरोग्य मंत्रालयाने म्हटलं  आहे. नीट-**PG** प्रवेश परीक्षेच्या प्रक्रियेचं सखोल मूल्यांकन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**भारत-बांग्लादेश**

भारत आणि बांगलादेश आज दोन्ही राष्ट्रांच्या समृद्धीसाठी दोन्ही देशांना एकत्र आणणे, वाणिज्य आणि सहयोग वाढविण्याच्या दृष्टीनं भविष्यासाठीच्या अनेक मुद्यांवर चर्चा केली. यामध्ये भारताचे विकसित भारत व्हिजन **2047** आणि बांगलादेशचे स्मार्ट बांगलादेश व्हिजन **2041** या बाबींना अधिक महत्व देण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी काल नवी दिल्लीत विविध करारांवर स्वाक्षरी केली. भारत आणि बांगलादेश यांच्यातील द्विपक्षीय चर्चेनंतर प्रसारमाध्यमांना माहिती देताना, भारताचे परराष्ट्र सचिव विनय मोहन क्वात्रा म्हणाले की, दोन्ही देशांनी डिजिटल भागीदारी , हरित भागीदारीच्या मुद्यांवर एकमत झाले.  दोन्ही बाजूंच्या नेत्यांनी दहशतवाद, कट्टरतावादविरोधी आणि दोन्ही देशांमधील सीमारेषेचे शांततापूर्ण व्यवस्थापन यावर प्रतिबद्धता वाढवण्यासही सहमती दर्शविली आल्याचंही क्वात्रा यांनी म्हटलं

**विश्वासार्ह-प्रवासी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आज नवी दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर फास्ट ट्रॅक इमिग्रेशन ट्रस्टेड ट्रॅव्हलर प्रोग्रामचे उद्घाटन होणार आहे. हा सरकारचा भारतीय नागरिक आणि भारतातील परदेशी नागरिकांसाठी तयार केलेला एक उपक्रम आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी, पात्र व्यक्तींना ऑनलाइन अर्ज करावा लागेल आणि इतर आवश्यक माहितीसह त्यांचे बायोमेट्रिक्सद्वारे आपली ओळख द्यावी लागणार आहे. आवश्यक पडताळणी आणि पात्रतेच्या निकषांची पूर्तता केल्यानंतर फास्ट ट्रॅक इमिग्रेशन अंतर्गत नोंदणी पूर्ण केली जाईल. या उपक्रमाद्वारे प्रवाशांच्या प्रवास अनुभवामध्ये आमूलाग्र

बदल घडवून आणणे तसेच प्रवास जलद, सोपा आणि अधिक सुरक्षित बनवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे.

**लीची**

पंजाबमधील पठाणकोट जिल्ह्यात सर्वोत्तम दर्जाची लिचीचे उत्पादन घेतले जात असून राज्याच्या लिची उत्पादनात जिल्ह्याचा **60** टक्के योगदान दिले जाते. यामधून शेतकऱ्यांना भरीव उत्पन्न मिळत आहे. पंजाबमध्ये साधारणपणे **3** हजार **9** शे हेक्टर क्षेत्रावर लिचीची लागवड केली जाते. तर पठाणकोट जिल्ह्यात हे प्रमाण **2** हजार **2** शे हेक्टर इतके आहे. लिचीची पहिली खेप लवकरच परदेशात निर्यात केली जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास आणि भूजलावरील त्यांचे अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील सुजानपूर येथे यापूर्वीच लिची इस्टेटची स्थापना करण्यात आली आहे.

**विश्वचषक क्रिकेट**

पुरुष वीस षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल रात्री अँटिग्वा इथं झालेल्या सामन्यात भारतानं बांगलादेशचा **50** धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना भारताने **196** धावा केल्या होत्या. तर बांगलादेशने **8** बाद **146** धावा केल्या. भारताकडून हार्दिक पांड्याने **27** चेंडूत **50** धावा केल्या, तर ऋषभ पंतने **28** चेंडूत **37** धावा केल्या. हार्दिक पांड्याला सामनावीर पुरस्कार देण्यात आला. दरम्यान सध्या अफगाणिस्तान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सामना सुरू असून शेवटचं वृत्त हाती आलं तेंव्हा अफगाणिस्तांननं दिलेल्या १४८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाच्या ९ बाद १३३ धावा झाल्या होत्या.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**